# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

☎ : २४०१०४३७/ २४०२०७८१/ २४०१४७०१
फॅक्स : २४०२४०६८
visit us at : http//mpcb.gov.in
email : enquiry@mpcb.gov.in

कल्पतरु पॉईंट, २/ ३/ ४ था माळा,
सिनेट प्लॅनेट समोर, सायन सर्कल,
सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२.

क्र. मप्रनि/ सस (जप्रनि)/ ~~ब~~- म- ५५ दिनांक ०७/०३/२०१४

प्रति,

१. उप विभागिय अधिकारी (महसूल), ता.पालघर, जि.ठाणे. — अध्यक्ष
२. उपायुक्त मत्स्यव्यवसाय, ता.पालघर, जि.ठाणे. — सदस्य
३. उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, तारापूर-१, जि.ठाणे. — सदस्य
४. तारापूर औद्योगिक उत्पादक संघटना, तारापूरचे प्रतिनिधी. (Tarapur Industrial Manufacturers Associations-TIMA) — सदस्य
५. तारापूर एन्व्हायर्नमेंट प्रोटेक्शन सोसायटी सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र, तारापूर — सदस्य
६. अध्यक्ष, नवापूर मच्छिमार विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्यादित, नवापूर, ता.पालघर, जि.ठाणे. — सदस्य
७. उप अभियंता (मलनिःसारण), म.औ.वि.महामंडळ, तारापूर, जि.ठाणे. — सदस्य सचिव

विषय : सागरी किनारपट्टीवरील प्रदुषणामुळे औद्योगिक विकास महामंडळ, तारापूर येथील मत्स्यव्यवसायावर होणाऱ्या परिणामाबाबत "पर्यावरण रक्षण व संवर्धन समिती" स्थापन करणेबाबत.

संदर्भ : १. मा.मंत्री, पर्यावरण व सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीचे इतिवृत्त दि.०४.०२.२०१४.
२. मा.मंत्री, पर्यावरण व सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र दि.०५.०२.२०१४.

**प्रस्तावना :**

मा.मंत्री, पर्यावरण व सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य यांच्या तारापूर येथील भेटीदरम्यान प्रदूषण नियंत्रण करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याबाबत निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार म.प्र.नि.मंडळाव्दारे आवश्यक कार्यवाही करण्यात आलेली होती. तद्नंतर सागरी किनारपट्टीवरील प्रदुषणामुळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, तारापूर येथील मत्स्यव्यवसायावर होणाऱ्या परिणामांबाबत दि.०४.०२.२०१४ रोजी मा.मंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसंबंधितांची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीदरम्यान तारापूर परिसरातील प्रदूषण नियंत्रणात आले नसल्याचे ग्रामस्थांनी निदर्शनास आणुन दिले.

मा.मंत्री महोदयांनी एमआयडीसी, महाड च्या धर्तीवर तारापूर येथे उप विभागीय अधिकारी (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्याबाबत निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार उप विभागीय अधिकारी (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

..२..

**समितीचे नाव :** " औद्योगिक वसाहत, तारापूर पर्यावरण रक्षण व संर्वधन समिती"

| | |
|---|---|
| १. उप विभागिय अधिकारी (महसूल), ता.पालघर, जि.ठाणे | - अध्यक्ष |
| २. उपायुक्त मत्स्यव्यवसाय, ता.पालघर, जि.ठाणे | - सदस्य |
| ३. उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, तारापूर-१, जि.ठाणे | - सदस्य |
| ४. तारापूर औद्योगिक उत्पादक संघटना, तारापूरचे प्रतिनिधी (Tarapur Industrial Manufacturers Associations-TIMA) | - सदस्य |
| ५. तारापूर एन्व्हायर्नमेंट प्रोटेक्शन सोसायटी सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र, तारापूर | - सदस्य |
| ६. अध्यक्ष, नवापूर मच्छिमार विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्यादित, नवापूर, ता.पालघर, जि.ठाणे | - सदस्य |
| ७. उप अभियंता (मलनिःसारण), म.औ.वि.महामंडळ, तारापूर, जि.ठाणे | - सदस्य सचिव |

**<u>समितीची कार्यकक्षा</u> :**

समितीची बैठक वर्षातून किमान चार वेळा साधारणपणे माहे फेब्रुवारी, मे, ऑगस्ट व नोव्हेंबर मध्ये घेण्यात यावी. आपात्कालिन परिस्थितीत समिती अध्यक्ष समितीची बैठक विशेष बाब म्हणुन बोलावू शकतात.

१. म.औ.वि.महामंडळ, तारापूर परिसर व सागरी किनारपट्टी येथील प्रदुषणासंबंधीच्या तक्रारीचा आढावा / पाहणी करणे व प्रतिबंधात्मक उपाययोजना सुचविणे,

२. उद्योग, सीईटीपी, एमआयडीसी यांच्याकडून होणाऱ्या प्रदूषण प्रतिबंधात्मक कारवाईचा आढावा घेऊन सुधारणा करण्याकरीता सुचना करणे.

३. आपात्कालिन परिस्थितीमध्ये म.प्र.नि.मंडळाच्या मदतीने जल प्रदुषणासंबंधी पंचनामे करुन नमुने गोळा करणे, सदर नमुने संकलनाच्यावेळी उद्योग, सीईटीपी, एमआयडीसी यांचे प्रतिनिधी व किमान दोन स्थानिक सदस्य उपस्थित असावेत.

४. सदर नमुने समिती अध्यक्षांच्या मान्यतेने शासनाचा अथवा शासनमान्य प्रयोगशाळेत पृथःकरणासाठी पाठविण्यात यावेत याची संपूर्ण कार्यवाही उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ यांनी करावयाची आहे. याकरीता येणारा खर्च सीईटीपी व्यवस्थापनाकडून देय असेल.

५. तारापूर एमआयडीसीतील जल प्रदुषणामुळे नैर्सगिक जलस्त्रोत शेती, मत्स्य व्यवसाय, इ.वर विपरित परिणाम झाल्यामळे येणाऱ्या तक्रारी, वर्तमानपत्र, दूरचित्रवाहिनीवर प्रसिध्द झालेल्या बातम्याच्या अनुषंगाने, सदरील ठिकाणी संबंधित विभागामार्फत भेटी देण्यात येऊन केलेल्या कार्यवाहीच्या अभिप्रायासह सविस्तर अहवाल गठित केलेल्या समितीचे अध्यक्ष व उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, तारापूर यांच्याकडे सत्वर पाठविण्यात यावा.

..३..

६. मासे मर्तुकीबाबतच्या प्राप्त तक्रारीप्रसंगी संबंधित विभागाच्या स्थानिक अधिकाऱ्यांनी समिती अध्यक्षांच्या निर्देशानुसार नमुने गोळा करुन, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, तारापूर यांच्याकडे पाठवावेत. सदर नमुने परिक्षण अहवाल प्रादेशिक न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळा, महाराष्ट्र शासन, ठाणे यांचेकडून प्राप्त करुन घेऊन सदर अहवाल समिती अध्यक्ष यांचेकडे पाठविण्यात यावा.

७. तारापूर एमआयडीसी व परिसर अनधिकृतरित्या घातक धनकचरा टाकत आलेला आढळल्यास, म.प्र.नि.मंडळाच्या स्थानिक कार्यालयास अवगत करणे.

८. खाडीतील पाण्याचे नमुने सहा महिन्यातुन किमान एक वेळ घेऊन म.प्र.नि.मंडळाकडे सुपूर्द करुन आवश्यक उपाययोजना सुचविणे.

९. एमआयडीसी व परिसरातील पर्यावरण संवर्धनाबाबत उद्योग, सीईटीपी, एमआयडीसी, म.प्र.नि.मंडळ यांच्या सहकार्याने अंमलबजावणीकरीता विशेष प्रकल्प सुचविणे.

१०. समितीच्या बैठकीचा अहवाल शिफारशीसह प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, ठाणे यांना तीन दिवसांत पाठविणे,

११. सदर प्राप्त अहवालावर प्रादेशिक अधिकारी, ठाणे यांच्यातर्फे पुढील ७ दिवसांत कारवाई करणे,

१२. प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, ठाणे सदर समितीच्या भेटीचा व कारवाईचा अहवाल म.प्र.नि.मंडळाच्या संकेतस्थळावर ठेवणे.

१३. सदर समिती आदेशाच्या दिनांकापासुन एक वर्षासाठी कार्यरत राहिल. समितीची कालमर्यादा वाढविणे अथवा पुर्नगठित करण्याचे सर्वाधिकार "सदस्य सचिव" म.प्र.नि.मंडळ, मुंबई यांचेकडे राहतील.

**( राजीव कुमार मित्तल, भा.प्र.से.)**
सदस्य सचिव

**प्रत माहितीकरीता सादर,**

**मा.अध्यक्ष,** म.प्र.नि.मंडळ, मुंबई.

**प्रत माहितीसाठी,**

१. **सह संचालक (जप्रनि)/ वरिष्ठ विधी अधिकारी,** म.प्र.नि.मंडळ, मुंबई.
२. **प्रादेशिक अधिकारी (मुख्यालय),** म.प्र.नि.मंडळ, मुंबई / **प्रादेशिक अधिकारी,** म.प्र.नि.मंडळ, ठाणे.
३. **उप प्रादेशिक अधिकारी,** म.प्र.नि.मंडळ, तारापूर-१/ २.

D:\My documents\HQ\WPAE Letter1.doc